**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक ०३ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या, नागपुर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी कडक बंदोबस्तासह प्रशासन सज्ज.**
- **राज्यात दुष्काळ निवारणासाठी ठोस पावलं उचलण्याची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची राज्य सरकारकडे मागणी.**
- **राज्याच्या शून्य कार्बन उत्सर्जन ध्येयात विदर्भातील चंद्रपूर आणि अमरावती शहराची निवड.**
- **येत्या सात जूनपर्यंत विदर्भात हलका पाऊस पडण्याची शक्यता, यवतमाळ इथं आज सर्वाधिक ४५ अंश सेल्सियस इतक्या कमाल तापमानाची नोंद.**

*****

विक्रमी मतदान

देशात लोकसभा निवडणुकीत आतापर्यंत सर्वाधिक मतदानाची नोंद झाली असल्याचं, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या निवडणुकीत चौसष्ट कोटीहून अधिक नागरीकांनी मतदानाचा हक्क बजावला आहे असं कुमार यांनी सांगितलं. यावर्षी विक्रमी मतदान केल्याबद्दल त्यांनी सर्व मतदारांचे आभार मानले आहेत. दरम्यान, उद्या होणाऱ्या मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाची तयारी पूर्ण झाल्याची माहितीही कुमार यांनी यावेळी दिली. आंध्र प्रदेश आणि ओडिशामधल्या विधानसभा निवडणुकांची तसंच विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी देखील उद्या होणार आहे.

उद्या मतमोजणी

राज्यातल्या ४८ लोकसभा मतदार संघात मतमोजणीची प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीन होण्याच्या दृष्टीन यंत्रणा सर्व तयारीनिशी सज्ज असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या सर्व मतमोजणी केंद्रावर एकूण १४ हजार ५०७ अधिकारी-कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. नागपुर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणी साठी कडक बंदोबस्त लावण्यात आला असून प्रशासन मतमोजणी साठी सज्ज झालेलं आहे. मतमोजणीच्या तयारी बद्दल अधिक माहिती दिली आहे निवडणूक निर्णय अधिकारी विपीन इटनकर....

***नागपूर मध्ये पण आपल्याकडे दोन पार्लमेंटरी कॉन्स्टिट्यूसी आहे तरी तयारी पूर्ण बऱ्यापैकी झालेली आहे आज सकाळी आम्ही रंगीत तालीम घेतलेली आहे जवळपास दोन्हीकडे सहा-सहा रूट आपण बनवले आणि प्रत्येक ग्रुप मध्ये 20 टेबल लावले जेणेकरून एकावेळेस १२० EVM ची मतमोजणी होईल आणि सगळ्यात पहिले सकाळी ८ वाजता स्ट्रॉंग रूमच सील तोडल्यावर पोस्टल बायलेट ची कॉऊंटिंग करू आणि ते झाल्यावर साडेआठ वाजता EVM ची कॉऊंटिंग सुरु करू. आमच्या अरेंजमेन्ट पूर्ण झालेल्या आहेत कॉऊंटिंग एजन्ट कॉऊंटिंग सुपरवाइझर कॉऊंटिंग सगळा स्टाफ पोस्टलचा स्टाफ सगळा स्टाफ आपण अलोट केलेला आहे. आणि आमचा प्रयत्न असा आहे कि इथे चार वाजेपर्यंत EVM चे राऊंड आम्ही संपवू. आणि त्याच्यानंतर जे मँडेटरी पाच पर्सेंट VVPAT च्या स्लिप मोजायच्या आहेत त्या VVPAT च्या स्लिप प्रत्येक लिस्ट मध्ये मोजण्याची प्रक्रिया सुरु करू. ज्यांच्या कडे आयडेंटिटी कार्ड आहे कॉऊंटिंग एजन्ट कॉऊंटिंग ऑफिसरच अलाऊड आहे बाकी कोणाला इथे अलाऊड केलेलं नाही.***

दरम्यान, मतमोजणीच्या फेऱ्यांमध्ये सर्वाधिक ३१ फेऱ्या भंडारा -गोंदिया मतदार संघात होणार आहेत. तर यवतमाळ-वाशीम इथं ३० फेऱ्या. याशिवाय नागपुरात २०, रामटेक २६, गडचिरोली-चिमूर -२६, चंद्रपूर २८, वर्धा २७, अमरावती २०, अकोला २८ आणि बुलढाणा इथं २५ फेऱ्या होतील.

रामदास आठवले

देशभरातील विविध एक्झिट पोल हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला, स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचा अंदाज वर्तवत आहेत. त्यात एनडीए ला 350 ते 375 जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. एक्झिट पोलच्या अंदाजा पेक्षा एनडीए ला जास्त जागा मिळतील. महाराष्ट्रात महायुतीला 35 ते 40 जागा मिळतील तर देशात एनडीए चारशे पेक्षा जास्त जागा जिंकण्यात यशस्वी होईल असा मला पूर्ण विश्वास असल्याचं मत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केल आहे. बांद्रा पूर्व इथं त्यांच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते.

उमेदवारांची यादी

राज्य विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी, भारतीय जनता पक्षानं, आज उमेदवारांची यादी जाहीर केली. कोकण पदवीधर मतदारसंघातून निरंजन डावखरे यांना, मुंबई पदवीधर मतदारसंघातून किरण शेलार यांना, तर मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवनाथ दराडे यांना भाजपनं उमेदवारी दिली आहे.

शरद पवार

राज्यात दुष्काळामुळ जनजीवन विस्कळीत झालं असून पाण्याच्या टंचाईनं बळीराजा आणि सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची कमतरता निर्माण झाली आहे. अशा स्थितीत या भीषणतेकडे राज्य सरकारचं लक्ष वेधूनही राज्य सरकारकडून कुठलीही ठोस भूमिका अद्याप घेण्यात आलेली नाही. जर ही दुष्काळाची स्थिती राज्यात कायम राहिली आणि राज्य सरकारकडून तातडीनं पावलं उचलली गेली नाहीत तर, महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी नक्कीच संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल. त्यामुळे दुष्काळ निवारणाबाबत योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आज केली. तसं पत्र त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिलं आहे.

पथकर

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं, देशभरातल्या महामार्गांवरच्या, टोलच्या दरात ५ टक्के वाढ केली आहे. ही दरवाढ आजपासून लागू होणार आहे. देशातल्या महामार्गांच्या जाळ्यावर एकूण ९०० टोल नाके आहेत.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे, दुर्धर आजारानं ग्रस्त रुग्णांना गेल्या १ वर्ष ११ महिन्यात दोनशे सदुसष्ट कोटी ५१ लक्ष अर्थसहाय्य वितरित करण्यात आलं आहे. मुंबईतल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष, मंत्रालय कार्यालयामधून तब्बल २४३ कोटींपेक्षा अधिक तर नागपूर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यालयामधून २४ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देण्यात आलं. त्या माध्यमातून ३२, हजार हून अधिक गंभीर रुग्णांचे प्राण वाचले. मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता मदत

मिळवण्यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर फोन करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळविता येईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अनेकविध आजारांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतःमूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण, अपघात, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,'असं आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी केलं आहे.

निवाडा जनतेचा

लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या ताज्या बातम्या देण्यासाठी आकाशवाणीवरुन उद्या निवडणूक विशेष बातमीपत्र प्रसारित करण्यात येणार आहेत. तसंच निवडणूक निकालांचं सर्वंकष विश्लेषण करणारा कार्यक्रम निवाडा जनतेचा हा कार्यक्रम सकाळी ९ वाजल्यापासून सादर होणार आहे.

शून्य कार्बन उत्सर्जन

हवामान बदलावरील बैठकीत भारतानं २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचं लक्ष्य गाठण्याचा संकल्प केला आहे. यातील अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबई, नवीमुंबई, पनवेल, ठाणे, अमरावती, नाशिक आणि चंद्रपूर या शहरांची निवड झाली आहे.महाराष्ट्र हे देशातील तिसरं सर्वात शहरीकरण झालेले राज्य आहे, जिथे शहरांतील मानव निर्मित सोयी सुविधांमार्गे ऊर्जेची जास्त मागणी आहे. ऊर्जेच्या वापरामुळे हरितगृह वायू उत्सर्जनात इमारत क्षेत्राचा मोठा वाटा आहे. भारताचं हवामान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शून्य उत्सर्जनाचं लक्ष्य ठेवून उर्जेचा वापर कमी करण आवश्यक आहे. कारण कार्बन उत्सर्जन हे २०५० पर्यंत धोकादायक स्तरावर पोहचेल. यासंबधी चंद्रपूर शहरात उपाययोजना राबविण्यासाठी आढावा बैठक आयुक्त विपीन पालीवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. यात कार्बन उत्सर्जन कमी करण्यास शहरातील पथदिवे बदलुन एलइडी लाइट्सचा वापर करणे, ऊर्जेचा वापर ५० टक्क्यांवर आणणे, सौर ऊर्जेसाठी रेंट अ रूफ धोरण राबविणे, बांधकामात इको फ्रेंडली विटांचा वापर करणे,खाजगी आणि शासकीय इमारतींवर सोलर पॅनेल बसविणे, विजेचा वापर कमी करून सौर ऊर्जेचा वापर

वाढविणे, स्वयंपाकात लाकूड कोळसा या परंपरागत इंधनांचा वापर कमी करणे इत्यादी उपाययोजना राबविण्यासंबंधी चर्चा करण्यात आली.

राज्यस्तरीय चर्चासत्र

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्र आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर, शाखा रिध्दपूर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या 15 आणि 16 जून, 2024 रोजी विद्यापीठ परिसरातील डॉ.श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन सेंटरमधील सभागृहामध्ये दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन 15 जून रोजी सकाळी 10 वा. पुणे इथं डॉ.सतिश बजवे यांच्या हस्ते होणार असून उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री प्रदीप दाते यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

डॉ.अनिल राठोड

यवतमाळ-वाशिम लोकसभा निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या आकडेवारीतील फरकाचे प्रकरण, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल झाले होते. याप्रकारणी दि. ३१ मे रोजी सुनावणी झाली असून केंद्रीय निवडणूक आयोग दिल्ली तसंच यवतमाळ आणि वाशीम जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांना, उच्च न्यायालयात हजर राहून स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं दिले आहेत. सदर प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत विजयी उमेदवारास विजयाचे प्रमाणपत्र देऊ नये अशी मागणी याचिकाकर्ते तथा समनक जनता पार्टीचे उमेदवार प्रा.डॉ.अनिल राठोड यांनी लेखी पत्राद्वारे निवडणूक आयोग दिल्ली, तसेच यवतमाळ जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

हवामान

येत्या सात जून पर्यंत विदर्भात हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. आज अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी, तर नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली इथं हलका पाऊस पडू शकतो असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. उद्या आणि परवा देखील अशाच प्रकारचं पर्जन्यमान राहणार असून सात तारखेपर्यंत संपूर्ण विदर्भात पावसाच्या हलक्या सरी बरसतील असा अंदाज आहे. दिवसभरात अधून मधून ढगाळ वातावरण असल्यानं उकाड्यात

प्रचंड वाढ झाली आहे. विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान यवतमाळ इथं 45 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं यवतमाळ पाठोपाठ चंद्रपूर इथं 43.4 अंश सेल्सियस तर अकोला, अमरावती आणि वाशिम हे जिल्हे 42 अंशाच्या घरात आहेत. नागपूर इथं गेल्या 24 तासात 41.8 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया तसंच बुलढाणा या जिल्ह्यांत कमाल तापमान 38 ते 40 अंशाच्या मध्ये आहे.

****